DAY — 03   SEAT NUMBER

2019	II	23	1100	J - 9	(M)

MARATHI (02)

Time : 3 Hrs.   (12 Pages)   Max. Marks : 80

कृतिपत्रिका

कृतिपत्रिकेसाठी सूचना :

(१) आकलन कृती व व्याकरण यांमधील आकृत्या किंवा चौकटी पेनाने अथवा पेन्सिलीने काढाव्यात.

(२) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखन नियमांनुसार लेखन याकडे जाणीवपूर्वक लक्ष दयावे.

विभाग १ - निबंधलेखन [१०]

कृती १. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे ३०० शब्दांपर्यंत निबंध लिहा :

(१) भ्रमणध्वनी (मोबाईल) शाप की वरदान

(२) वीज नसती तर ......

(३) वर्षा ऋतूतील आमची सहल

(४) शेतकऱ्याचे मनोगत

https://www.maharashtrastudy.com

विभाग २ - गद्य

[१२]

कृती २. (अ) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा : (४)

(१) विशेषण प्रकार ओळखा : (१)

दोन मुली - [ ]

(२) फ्रामरोझच्या दोन मुलींचे व्यवसाय - (१)

(१) [ ] (२) [ ]

फ्रामरोझ मूळचा वाराणसीचा. त्याला दोन मुली. त्या मोठ्या झाल्यानंतर त्यांच्या शिक्षणाची समस्या निर्माण झाली. वाराणसीत सोयी नव्हत्या, म्हणून फ्रामरोझ त्याच्या दोन लेकींसह मुंबईत स्थायिक होण्यासाठी आला. दोन्ही मुली उत्तम शिकल्या. मोठी लेक शल्यविशारद होऊन अमेरिकेत स्थायिक झाली. दुसरी निष्णात वकील होऊन लंडनला गेली. तीही तिकडेच घरवाडी करून राहिली. फ्रामरोझ मुंबईत एकटाच राहिला. त्याच्याकडे सुदैवाने पैसे होते. त्यामुळे तो सुखात राहायचा. एका क्लबचा सभासद झाला. तिथे तो रोजची सायंकाळ आनंदात साजरी करायचा.

क्लबातल्या त्याच्या मित्राच्या बोलण्यात आलं, की आजकाल सार्वजनिक इस्पितळांत रुग्णांची हातसळ कामं करायला नोकर मिळत नाहीत. परिचारिका मिळतात, रुग्णवाहिकांसाठी चालक मिळतात, आया मिळतात, पण हाताखाली काम करणारी 'मुले' मिळत नाहीत. त्यामुळे रुग्ण तळमळत पडतात.

हे ऐकल्यावर एक्क्याण्णव वर्षांच्या त्या वृद्ध नि कृतार्थ फ्रामरोझच्या हृदयात एक हाक निनादली. त्याला वाटलं, इस्पितळातली रुग्णसेवेची ही हलकीसलकी कामं आपण का करू नयेत? आपलं आरोग्य खडखडीत आहे. धनदौलत भरपूर आहे. आपल्यापाशी वेळही मुबलक आहे. मग उरलेलं आयुष्य आपण रुग्णसेवेत का वेचू नये?

(३) 'मग उरलेलं आयुष्य आपण रुग्णसेवेत का वेचू नये'? या विधानातील आशयसौंदर्य ८ ते १० ओळींत लिहा. (२)

https://www.maharashtrastudy.com

(ब) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा : **(४)**

आता तो एकटाच शिपाई आमच्या तिघांवर पहारा करीत होता. दगडावर बसलेला मी, माझ्या मांडीवर रक्तबंबाळ डोकं टेकून बसलेला नाईक लालसिंग व समोर पडलेला तो डोग्रा जवान! बाजूला तीन-चार मृत देह पडलेले होते. एवढ्यात मी त्या चिनी शिपायाला त्या डोग्रा जवानाजवळ जाताना पाहिले. आता हा त्याला काय करतोय म्हणून आम्ही दोघंही पाहातच राहिलो! तो त्याच्या अगदी जवळ गेला व जवानाच्या छातीपासून चार-पाच इंचावरती बंदुकीच्या नळीचे टोक धरले. त्या जवानाने उठण्याचा प्रयत्न केला, पण तेवढ्यात चिनी शिपायाच्या ऑटोमॅटिक रायफलीतून पाच-सहा गोळ्यांची एक फैर मारली गेली. डोग्रा जवान उठता उठता तसाच कोसळला. लगेच चिनी शिपाई खाली वाकला. त्याने त्या जवानाच्या मनगटावरचे घड्याळ काढून घेतले व घाईघाईने स्वत:च्या खिशात ठेवले. मग तो आमच्याजवळ येऊ लागला. ना. लालसिंग मला म्हणाला, "साहब, अभी हमको यह मार देगा ना?" मी म्हटले, "देखते हैं।" घड्याळ माझ्याही हातात होते. पण एवढं सर्व करून आता रणांगणात घड्याळासाठी जीव जावा हे कसंतरीच वाटत होतं! शिपाई आता माझ्याजवळ आला व त्याने माझ्या कपाळाजवळ बंदुकीच्या नळीचे टोक धरले. स्वत:च्या तोंडावर डाव्या हाताचे बोट धरून व डोळे मोठे करून कुणाला सांगायचे नाही असं खुणेने त्याने मला बजावले! मग त्याने तिसऱ्याच शिपायाला जवळ बोलावून आमच्या पहाऱ्यावर ठेवले व स्वत: निघून गेला. एका घड्याळासाठी प्राण गमावलेल्या त्या डोग्रा जवानाच्या मृत देहाकडे आम्ही दोघंही असहाय्यपणे पाहात राहिलो.

'सैनिकाच्या जीवनाविषयी' तुमचे मत १२ ते १५ ओळींत लिहा.

किंवा

'देशसेवेसाठी माझे योगदान' या विषयी १२ ते १५ ओळी लिहा.

(क) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा : **(४)**

(१) उताऱ्यात आलेल्या कथाप्रकाराचे नाव - (१)

https://www.maharashtrastudy.com

(२) तुलना करा : (१)



एका दृश्याने लक्ष वेधून घेतलं, गाडी मध्येच थांबली होती. आकाशाला भिडणारे हिरवेगार डोंगर होते. त्या डोंगरालगत काळे, पांढरे ढग इतस्तत: वावरत होते. विरल कापुसलेले पांढरे ढग वरवर जात होते. जलद असे काळेसावळे ढग खाली येत होते. मधूनच त्यांची टक्कर होत होती.

त्या ढगांकडे अनिमिष नेत्रांनी पाहता पाहता कधी तरी वाचलेल्या वि. स. खांडेकरांच्या रूपककथेची आठवण झाली.

पांढरे ढग वर वर जात होते. काळे ढग खाली खाली धरित्रीकडे येत होते. पांढऱ्या ढगांनी तुच्छतेने त्या काळ्या ढगांकडे पाहिले. आमचे स्थान पाहा किती उच्च, असा गर्वोक्त अभिप्राय त्या नजरेत होता. काळे ढग त्यांना सांगत होते, 'आम्ही सृष्टीवर बरसण्यासाठी खाली खाली जात आहोत. आम्हांला पृथ्वीवरील माणसांना पाणी द्यायचे आहे, पृथ्वीचे सस्यश्यामलतेचं स्वप्न साकार करायचं आहे. जीवन फुलवायचं आहे. आमचा वर्ण काळा असला तरी अंतरंग दयावंत आहे. दुसऱ्यासाठी जगतात ते खऱ्या अर्थानं जगतात. आम्ही खाली जात असलो, तरी आमच्या जीवनाची त्यातच सार्थकता आहे. तेच उच्च स्थान आहे.

(३) 'आमचा वर्ण काळा असला, तरी अंतरंग दयावंत आहे' या वाक्यातील आशय तुमच्या शब्दांत ८ ते १० ओळींत लिहा. (२)

https://www.maharashtrastudy.com

विभाग ३ - पद्य

[८]

कृती ३. (अ) खालील 'अखंडा'च्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा : (४)

(१) समानार्थी शब्द लिहा : (१)

आचरण -

पांगळा -

(२) आई-वडिलांची 'मुलामुलींसाठी असणारी कर्तव्ये' व्यक्त करणारी काव्यपंक्ती लिहा : (१)

स्त्रीपुरुषें सर्व कष्टकरी व्हावें ॥ कुटुंबा पोसावें॥
आनंदाने ॥ ध्रु ॥

नित्य मुलीमुलां शाळेंत घालावें ॥अन्नदान द्यावें॥
विद्यार्थ्यांस ॥ २ ॥

सार्वभौम सत्य स्वत: आचरावें ॥सुखे वागवावें॥
पंगु लोकां ॥ ३ ॥

अशा वर्तनानें सर्वां सुख द्याल ॥स्वत: सुखी व्हाल॥
जोती म्हणे ॥४॥

(३) 'सत्यवर्तना'विषयीचे तुमचे मत ८ ते १० ओळींत लिहा. (२)

(ब) *खालील कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :* (४)

कसे देवाचे आकाश त्याचे कोरडेच डोळे
जीव किती हे जळावे माझ्या धरतीचे भोळे
मायमातीची लेकरं त्यांना आसवांची वाट
वाट पाहता पाहता होई रात्रीची पहाट
पहाटेच्या प्रहराला स्वप्न अंकुराचे जळे

https://www.maharashtrastudy.com

झाला भुईचा दुष्मान दुष्ट दुष्काळ सारखा
आटलेला हा पाऊस ढगा – जगाला पारखा
माणसाच्या प्राक्तनाशी नित्य निसर्ग का खेळे

झुंज वावराच्यासाठी झुंज माळरानासाठी
देता देता वाहतील झरे गर्भातले पाठी
उदास हे वाळलेले पुन्हा बहरतील मळे

'उदास हे वाळलेले पुन्हा बहरतील मळे' या काव्यपंक्तीतील आशावाद १२ ते १५ ओळींत तुमच्या शब्दांत लिहा.

किंवा

'शेतकरी आणि निसर्ग यांच्यातील नाते' १२ ते १५ ओळींत तुमच्या शब्दांत लिहा.

विभाग ४ – व्याकरण [१२]

कृती ४. (अ) खाली दिलेल्या पर्यायांतून निर्दोष शब्द ओळखून चौकटींत लिहा : (२)

(१) (य) सहानुभूती (र) सहानूभुती
(ल) साहानुभूति (व) सहानुभुती

[ ]

(२) (य) निघृण (र) निरघुण
(ल) निर्घृण (व) निर्घृन

[ ]

(आ) खालील वाक्प्रचारांचा अर्थ वाक्प्रचारांसमोरील चौकटींत लिहा : (२)

(१) मान डोलावणे – [ ]
(य) मान हलवणे (र) पसंती दर्शविणे
(ल) नमस्कार करणे (व) शरण येणे

(२) वाडेकाडे बोलणे – [ ]
(य) रागाने बोलणे (र) अद्वातद्वा बोलणे
(ल) भरभर बोलणे (व) लडिवाळपणे बोलणे

https://www.maharashtrastudy.com

(इ) खालील वाक्यांतील वाक्यप्रकारांचा योग्य पर्याय ओळखून चौकटीत लिहा : (२)

(१) बालक हा पहिला शास्त्रज्ञ असतो.

(य) नकारार्थी (र) प्रश्नार्थी
(ल) विधानार्थी (व) उद्गारार्थी

(२) मानसी बोर्डात पहिली येणार नाही; असे नाही.

(य) प्रश्नार्थी (र) उद्गारार्थी
(ल) नकारार्थी (व) विधानार्थी

(ई) खालील वाक्यांत येणाऱ्या योग्य विरामचिन्हांचा पर्याय निवडून चौकटींत लिहा : (२)

(१) आणि ते माझ्या नातवालाही शोभायला हवं

(य) स्वल्पविराम, प्रश्नचिन्ह
(र) दुहेरी अवतरणचिन्ह, उद्गारवाचक चिन्ह
(ल) स्वल्पविराम, उद्गारवाचक चिन्ह
(व) अवतरणचिन्ह, प्रश्नचिन्ह

(२) का वो पैलवान, ती भुतं आसत्यात तरी कुटं

(य) उद्गारवाचक चिन्ह, स्वल्पविराम
(र) दुहेरी अवतरणचिन्ह, प्रश्नचिन्ह
(ल) प्रश्नचिन्ह, उद्गारवाचक चिन्ह
(व) एकेरी अवतरणचिन्ह, पूर्णविराम

(उ) खालील विधानातील व पद्यपंक्तींतील रस ओळखून चौकटींत लिहा : (२)

(१) पाण्यावर सांडलेले चांदणं पाहिलं की वाटायचं सगळा समुद्र ओंजळीत पकडावा.

(य) करुणरस (र) हास्यरस
(ल) भयानकरस (व) शांतरस

https://www.maharashtrastudy.com

(२) बाईच्या ओठांआड दडलेले असते रडणे
वर वर हसणे आणि आतल्या आत कुढणे !

(य) करुणरस (र) शांतरस

(ल) शृंगाररस (व) भयानकरस

(ऊ) खाली दिलेल्या पर्यायांतून पारिभाषिक शब्दांसाठी योग्य तो पर्याय निवडून चौकटींत लिहा : (२)

(१) Nutrition

(य) जीवनसत्त्वे (र) अन्नघटक

(ल) पोषण (व) उष्मांक

(२) Zone

(य) शहर (र) विभाग

(ल) प्रदेश (व) गाव

विभाग ५ – विनोद : एक वाङ्मयप्रकार [८]

कृती ५. खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :

(१) खालील अर्थाचे उताऱ्यात आलेले इंग्रजी प्रतिशब्द लिहा : (१)

(१) नाराज –

(३) आधुनिक –

(२) रानड्यांच्या बंगल्याची वैशिष्ट्ये : (१)

बायकोनं अशी भीती घातल्यामुळं मी निघतानाच थोडासा नर्व्हस झालो. रव्या आणि रश्मी तसे खास 'पुणेरी' वृत्तीचे असले, तरी रव्या मात्र गप्पांना

https://www.maharashtrastudy.com

एकदम मस्त माणूस! त्याच्या अशा दिलखुलास स्वभावामुळे तो बायकोचा 'माहेरचा नातेवाईक' आहे, हेसुद्धा विसरायला होते. अर्थात हे माझी पत्नी मला कधीच विसरू देत नाही, हा भाग अलाहिदा.

आम्ही साशंक मनानं आणि धडधडत्या अंत:करणानं रानड्यांच्या बंगल्याच्या प्रवेशद्वारापाशी येऊन थडकलो. तर तिथं आमच्या स्वागतासाठी चक्क बँड वाजत होता. बँडवाले 'क्या करूँ हाऽऽये कुछ कुछ होता है' वाजवत होते. मी पुन्हा एकदा 'बंगला रव्या रानडेचाच आहे ना' याची खात्री करून घेतली.

मानसी ही 'बोर्डात हमखास येऊ शकेल' या जातीची मुलगी. तिचा थोरला भाऊ हा केवळ दीड मार्क कमी पडल्यानं बोर्डात येता येता राहिला होता. तो अनुभव ध्यानात घेऊन मानसीबाबत रानडे मंडळी दक्षता घेत होती.

त्यांचा बंगला तसा मॉडर्न कॉलनीतल्या शांत भागात होता. बंगल्याच्या आजूबाजूला चक्क झाडीबिडी. बंगला आतल्या बाजूला असल्यानं वाहतुकीचा आवाज शून्य! अभ्यासात अडथळा आलाच, तर तो पक्ष्यांच्या किलबिलाटाचाच काय तो येणार. https://www.maharashtrastudy.com

(३) 'तुम्ही अनुभवलेल्या परीक्षेतील गमती-जमती' १२ ते १५ ओळींत लिहा : (४)

किंवा

तुमच्या दहावीच्या परीक्षेसाठी पालकांनी केलेल्या धडपडीचे वर्णन १२ ते १५ ओळींत लिहा.

(४) 'बारावीच्या अभ्यासाची पूर्वतयारी' या विषयी तुमचे अनुभव ८ ते १० ओळींत लिहा. (२)

विभाग ६ – सर्जनशील लेखन [१०]

कृती ६. (अ) खालील कवितेचे १५ ते २० ओळींत रसग्रहण करा : (६)

शहर आणि गाव

या शहराच्या कुशीत आलो सोडून माझा गाव
रोज भळभळे गावाकडल्या आठवणींचा घाव
शहर असे व्यवहारी पक्के तोलून बघते नाती
आपुलकीच्या ओव्या गावामधल्या जात्यांवरती
शहरामधल्या दरवाजांना कधी नसे शेजार
गावाकडल्या घरांस होतो उंबऱ्यांचाही भार

https://www.maharashtrastudy.com

या शहरातील देव असे की केवळ नवसापुरते
गावाकडल्या राखणदारा एक प्रार्थना पुरते
शहरामध्ये किती ही मस्ती हवेत उडती पैसे
घामाची, कष्टाची गावी फुलून येती कणसे
गगनभेदी या वास्तू पाहून दडपून जाते छाती
माझ्या चपला गावाकडची घेऊन फिरती माती
शहरामध्ये जगतानाही सोबत घेतो गाव
म्हणून गर्दीच्या दरयावरती तरते माझी नाव

– विष्णू सुर्या वाघ

किंवा

(अ) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर १५ ते २० ओळींत संवादलेखन करा :

(१) 'वाहतुकीची होणारी कोंडी' या विषयी वाहतूक पोलीस आणि विद्यार्थी यांच्यामधील संवाद.

(२) 'खेळाचे महत्त्व' याबाबत दोन मित्र / मैत्रिणींमधील संवाद.

(३) 'भ्रमणध्वनीचा (मोबाईल) वाढता वापर' याबाबत दोन विद्यार्थ्यांमधील संवाद.

(ब) (१) खालील वाक्यातील पूर्णाभ्यस्त शब्द शोधून लिहा : (१)

वाक्य – तुकाराम झपझप चालला होता.

पूर्णाभ्यस्त शब्द – [ ]

(२) खालील वाक्यातील अंशाभ्यस्त शब्द शोधून लिहा : (१)

वाक्य – माझा बंगला त्या माळरानावर ओकाबोकाच वाटत होता.

अंशाभ्यस्त शब्द – [ ]

(३) खालील वाक्यातील क्रियापदाचे स्थान बदलून उठावदार वाक्यरचना करा : (१)

वाक्य – हिराची आई मला फार आवडली.

(४) खालील पद्यपंक्तीतील 'अशुभाचे प्रतीक' ओळखून लिहा : (१)

'गढीवर घुबड आहे
पण ते केवळ बुजगावणे आहे'

अशुभाचे प्रतीक – [ ]

https://www.maharashtrastudy.com

विभाग ७ - उपयोजित लेखन

कृती ७. (अ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा : (१०)

(१) दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे 'लेखासंबंधीची माहिती' सुमारे १५ ते २० ओळींत लिहा.

लेख – स्वरूप व महत्त्व – वाचकावर होणारा परिणाम – लेखांचे प्रकार – वृत्तलेख – प्रासंगिक लेख – योग्य उदाहरणासहित स्पष्टीकरण.

(२) दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे 'आकाशवाणीवरील बातमीपत्राची माहिती' सुमारे १५ ते २० ओळींत लिहा.

पूर्वतयारी – बातमीनिवड – विविधता – बातमीपत्राचे स्वरूप – लेखन व संपादन – भाषाशैली – कालावधी – शब्दमर्यादा.

(३) दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे 'दूरचित्रवाणीवरील रिॲलिटी शो' विषयी १५ ते २० ओळींत माहिती लिहा.

आवडता रिॲलिटी शो – भाषाशैली – केशभूषा – वेशभूषा – संवाद – कथानक – सूत्रसंचालकाची महत्त्वपूर्ण भूमिका.

(ब) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर मुलाखतपूर्व प्रश्नावली तयार करा : (५)
(१० ते १५ प्रश्न अपेक्षित)

(१) प्लास्टिक निर्मूलनाचा संदेश देणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्याची मुलाखत.

(२) भाजीविक्रेत्याची मुलाखत.

(३) आधुनिक शेतीचे प्रयोग करणाऱ्या शेतकऱ्याची मुलाखत.

(क) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा : (५)

खालील मराठी शब्दांसाठी योग्य इंग्रजी प्रतिशब्द लिहा :

(१) संकेतस्थळ – ______ (१)

(२) 'मार्कअप' म्हणजे (१)
- इंग्रजीत – ______
- मराठीत – ______

https://www.maharashtrastudy.com

(३) संकेतस्थळासाठी प्रमाणित भाषा – (१)

संकेतस्थळ तयार करण्यासाठी हायपर टेक्स्ट मार्कअप लँग्वेज (HTML)चा वापर करावा लागतो. म्हणजे संकेतस्थळासाठीचा मजकूर या भाषेच्या नियमांनुसार लिहावा लागतो. या भाषेविषयी थोडक्यात समजून घेऊ.

संकेतस्थळांवरील महितीच्या आदान–प्रदानासाठी एका प्रमाणित भाषेची गरज होती. त्यामुळे १९९० मध्ये हायपर टेक्स्ट मार्कअप लँग्वेज (HTML) या भाषेची प्रमाणित संहिता तयार करण्यात आली. या भाषेवर कुणाचीही मालकी नाही. या भाषेचे जुजबी ज्ञान असणाऱ्या कुणालाही स्वत:चे संकेतस्थळ स्वत:च तयार करता येते. त्यासाठी वर्ड प्रोसेसरमध्ये मजकूर देवनागरीत लिहायचा. हा मजकूर लिहिण्यासाठी 'युनिकोड' किंवा 'बराहा' वापरता येईल. त्या मजकुरात विशिष्ट ठिकाणी या भाषेच्या विशेष खुणा नोंदवायच्या. मजकूर तयार झाला, की एचटीएमएल एडिटर वापरून या विशेष खुणा नोंदवता येतात. या विशेष खुणांना (tags) 'मार्कअप' म्हणतात. या खुणा दिसत नाहीत, पण त्यांच्यामुळे मजकूर शिस्तबद्ध पद्धतीने संकेतस्थळावर दिसतो. त्यानंतर htm असा त्या धारिकेला (file) विस्तार द्यायचा व धारिका सेव्ह करायची की संकेतस्थळ तयार झाले. वर्ड प्रोसेसरमध्ये मजकूर तयार करून एचटीएमएल भाषेचे रूपांतर करणारे कन्व्हर्टर प्रोग्रॅम्सही उपलब्ध आहेत. पण आपले संकेतस्थळ आकर्षक करण्यासाठी आपणच आरेखन करून त्यानुसार खुणा नोंदवणे अधिक चांगले असते. अक्षरनिवड, मजकूर, त्याचे योग्य परिच्छेद, चित्रांच्या धारिका, हायपर टेक्स्टसाठी दुवे (links) या गोष्टी लक्षात ठेवून आपण आपले संकेतस्थळ तयार करू शकतो. पुढील टप्प्यासाठी Java.php किंवा Flash ही पॅकेज वापरता येतील.

(४) 'संकेतस्थळ आकर्षक करण्याबाबतची तुमची भूमिका' ८ ते १० ओळींत विशद करा. (२)

◆◆◆

https://www.maharashtrastudy.com
Whatsapp @ 9300930012
Send your old paper & get 10/-
अपने पुराने पेपर्स भेजे और 10 रुपये पायें,
Paytm or Google Pay से

https://www.maharashtrastudy.com